पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

मा. फ प्रभाग समिती

कार्यपत्रिका क्रमांक – २

सभावृत्तांत

दिनांक – ०७/५/२०१८ वेळ : स. ११.३०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक ०७/५/२०१८ रोजी स. ११.३० वा. फ प्रभाग कार्यालयाचे राजर्षी शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१.	मा.घोलप कमल अनिल	सभापती
२.	मा.साधना अंकुश मळेकर	सदस्य
३.	मा. कुंदन अंबादास गायकवाड	सदस्य
४.	मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे	सदस्य
५.	मा.संजय बबन नेवाळे	सदस्य
६.	मा. भालेकर प्रविण महादेव	सदस्य
७.	मा.संगीता (नानी) प्रभाकर ताम्हाणे	सदस्य
८.	मा.पंकज दत्तात्रय भालेकर	सदस्य
९.	मा.उत्तम प्रकाश केंदळे	सदस्य
१०.	मा.पवळे सुमनताई मधुकर	सदस्य
११.	मा.दिनेश लालचंद यादव	नामनिर्देशित सदस्य
१२.	मा.संतोष भाऊसाहेब मोरे	नामनिर्देशित सदस्य
१३.	मा.पांडुरंग गुलाब भालेकर	नामनिर्देशित सदस्य

याशिवाय खालील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते

श्री. मनोज लोणकर, प्र. क्षेत्रीय अधिकारी,श्री सतीश इंगळे, कार्यकारी अभियंता,स्थापत्य श्री विशाल कांबळे,कार्यकारी अभियंता,पा.पु.,श्री प्रविण घोडे,कार्यकारी अभियंता,विदुयत, श्रीमती प्रभावती गाडेकर, प्रशासन अधिकारी, श्री राजेंद्र राणे,उपअभियंता, स्थापत्य,श्री संजय तुपसाखरे,उपअभियंता, श्री अशोक अडसूळे, उपअभियंता, श्री मोहन खोंद्रे,उपअभियंता,झोनिपु विभाग,श्री सुरेश घोडे, वृक्षसंवर्धन,उदयान,श्री सतीश वाघमारे,कनिष्ठ अभियंता, श्री अश्लेष चव्हाण,कनिष्ठ अभियंता, श्री गोरडे डी डी, अतिक्रमण निरिक्षक हे उपस्थित होते.

मा.घोलप कमल अनिल यांनी उपस्थिताचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली

अ) कार्यपत्रिका क्रमांक ९ दिनांक - ५/२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे असे मा.सभापती यांनी प्रकट केले

ब) कार्यपत्रिका क्रमांक १० दिनांक - २६/४/२०१८ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे असे मा.सभापती यांनी प्रकट केले

(कृपया मागे पहा)

क) कार्यपत्रिका क्रमांक १दिनांक - २७/४/२०१८ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे असे मा.सभापती यांनी प्रकट केले

विषय क्र. -१
दिनांक - ७/५/२०१८
सुचक - मा.पवळे सुमनताई मधुकर

ठराव क्र. -२
विभाग – प्रशासन
अनुमोदक – मा. भालेकर प्रविण महादेव

संदर्भ - प्रशासन विभागाकडील पत्र क्र.फक्षेका/नि-४/कावि/१८१/२०१८, दि.२७/२/२०१८

सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक तयार करुन मा.प्रभाग समितीपुढे अवलोकनार्थ सादर करावयाचे असलेने ३० अंदाजपत्रक पुस्तकाच्या प्रतींची छपाईसाठी प्राप्त लघुत्तम दरधारक मे.डी.एन.एम. प्रिटींग हाऊस यांचेकडून छपाई करुन घेणेत आलेले आहेत. सदर छपाईकामी प्रती पुस्तक र.रु.७६५/- नुसार र.रु.२२,९५०/- (जी.एस.टी.सह) झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वोनुमते मान्य झाला.

विषय क्र. - २
दिनांक - ७/५/२०१८
सुचक - मा.साधना अंकुश मळेकर

ठराव क्र. -३
विभाग – स्थापत्य
अनुमोदक – मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

संदर्भ - स्थापत्य विभागाकडील पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/१६३/२०१८, दि.३/३/२०१८

श्री राहुल नथूराम शिंदे यांची भोसरी विधानसभा क्षेत्राकरीता ग्राहक प्रतिनिधी सदस्य घरगुती विदयुत क्षेत्र या पदावर नियुक्ती करणेत आलेली असल्याने नामफलक लावणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वोनुमते मान्य झाला.

यानंतर मा .सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(घोलप कमल अनिल)
सभापती
फ प्रभाग समितीनिगडी,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/४९४/२०१८
दिनांक. ८/५/२०१८

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.